नगरसचिव

पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. ३**

**जून २०१८**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १९ जून २०१८ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र.७१**

संदर्भ:– १) आ.क्र. २०१–१३३३१ दि. २२/१२/२०१६ अन्वये देण्यात आलेली परचेस नोटीस पत्र
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/१४७ दि. ७/७/२०१७ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.८९८ दि. २६/९/२०१७
४) मनपा ठराव क्र.६९४, दि.२०/१२/२०१७
५) मनपा ठराव क्र.१०६१, दि.२१/३/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे पेठ कोथरुड स.नं. २२ हि.नं. ३ येथील सी–२ (कर्मशियल सेंटर) करीताच्या आरक्षित क्षेत्राचे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जून २०१८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४, दि.२३/४/२०१८ चा झाला आहे.)**

**विषय क्र.७२**

संदर्भ:– १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मंडई वि./५४ दि.७/५/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५७ दि. २२/५/२०१८

----

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

टेंडर क्रमांक २/२०१७ ने कै.मदनदादा मुंडे मार्केट येथील ४० गाळे ५ वर्षे मुदतीसाठी वाटप करण्याकरिता निविदा क्रमांक २/२०१७ ने दोन पाकिट पध्दतीने दिनांक २४/११/२०१७ जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार एकूण २९ निविदा प्राप्त झाल्या असून, त्यापैकी २५ निविदा पात्र झालेल्या आहेत. या २५ पात्र निविदाधारकांपैकी गाळा क्र. ३४ व ४२ साठी २ निविदा प्राप्त झाल्या होत्या अशा प्रकारे २३ गाळयांसाठी २५ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

उपरोक्त नमुद गाळा क्र. ३४ व ४२ साठी मुळ गाळाधारकाने निविदेत असलेले अधिकतम रक्कम देण्याचे कबुल केल्याने त्यांची शिफारस करण्यात आली आहे.

सबब एकूण २३ गाळयांचा तपशील खालीलप्रमाणे.

त्याप्रमाणे पात्र अर्जदारांची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे देत आहोत.

| अ. क्र. | अर्जदारांचे नाव | गाळा क्रमांक | मनपाने निश्चित केलेली रक्कम | अर्जदारांनी देवू केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | फिरोज दिलावर बागवान ,अशरफी फ्रुट कंपनी | १० | ८८९/- | १०००/- |
| २ | राजेश रंगनाथ भोसले | २७ | ८८९/- | ९०१/- |
| ३ | राजश्री संजय जिमन | २८ | ८८९/- | ९०३/- |
| ४ | मयुर विनोद गादीया | २९ | ८८९/- | ८९८/- |
| ५ | अनिल शत्रुघ्न परबत | ३१ | ८८९/- | ८९८/- |
| ६ | सिध्दांत संतोष जाधव | ३२ | ८८९/- | ९०५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | बालाजी संभाजी माने | ३३ | ८८९/- | ८९९/- |
| ८ | कैलास विठ्ठल भिंगारे | ३४ | ८८९/- | ९०५/- |
| ९ | उमेश अ. खत्री | ३५ | ८८९/- | ८९७/- |
| १० | मयुरेश दिपक सातपुते | ३६ | ८८९/- | ८९५/- |
| ११ | विकास प्रकाश कातकर | ३७ | ८८९/- | ९०२/- |
| १२ | राम नारायण वाक | ३८ | ८८९/- | ८९८/- |
| १३ | अशोक रामेश्वर दळवे | ३९ | ८८९/- | ९०३/- |
| १४ | योगेश रुपसिंह चौहान | ४० | ८८९/- | ९०१/- |
| १५ | रघुनाथ रामशंकर यादव | ४२ | ८८९/- | ९०२/- |
| १६ | राजेंद्र किसन दळवी | ४३ | ८८९/- | ८९६/- |
| १७ | नामदेव प्रल्हाद दरगुडे | ४४ | ८८९/- | ८९५/- |
| १८ | अर्चना कैलास निवेकर | ४५ | ८८९/- | ८९८/- |
| १९ | आकाश रामदास निकम | ४६ | ८८९/- | ९०१/- |
| २० | चंद्रकांत मल्हारराव कोंडे | ४७ | ८८९/- | ८९२/- |
| २१ | राहुल सुखदेव पवार | ४८ | ८८९/- | ८९३/- |
| २२ | अंकिता दत्तात्रय काशीद | ४९ | ८८९/- | ८९०/- |
| २३ | सोनल राजेंद्र कोंडे | ५० | ८८९/- | ८९८/- |

तरी मिळकत वाटप नियमावली नुसार कै.मदनदादा मुंडे मार्केट येथील गाळे उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे निविदेमधील अटी व शर्तीनुसार ५ वर्षे मुदतीसाठी वाटप करणेस व तीन वर्षानी १२% भाडेवाढ करणेस व त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७३**

संदर्भ:- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/७६ दि. १९/५/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१६५ दि. २२/५/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे पेठ सदाशिव विश्रामबागवाडा या ऐतिहासिक वास्तुमधील शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे हे पेठ शनिवार पुणे म.न.पा. न.वि.गाडगीळ शाळेच्या इमारतीमध्ये ३० वर्षाकरीता स्थलांतरीत करणेकरीता दरमहा मासिक भाडे र.रुपये ६३,७८९/- (अक्षरी रुपये त्रेसष्ट हजार सातशे एकोणनव्वद फक्त) व (दर ३ वर्षांनी १२% भाडेवाढ करुन) आकारुन देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७४**

संदर्भ:- १) मा.सौ.मंजुषा नागपूरे, मा.दिलिप बराटे, मा.सौ.संगिता ठोसर, मा.सौ.वैशाली मराठे, मा.सौ.लक्ष्मी दुधाने, मा.सुनिल कांबळे, मा.मारुती तुपे, मा.सौ.कविता वैरागे, मा.दिलिप वेडेपाटील व मा.उमेश गायकवाड यांचे दि.२२/५/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१७१ दि. २२/५/२०१८

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१८-१९ मधील खालील नमूद केलेल्या विकास कामांमध्ये "मांडव/मंडप उभारणे" या ऐवजी "वारकऱ्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपात निवारा केंद्र उभारणे" असा बदल करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | बजेट कोड | तपशील |
|---|---|---|
| १ | RE17F123 | पालखी, चतु:श्रुंगी यात्रा व गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक इ. |
| २ | | मांडव उभारणे (भवन) |
| ३ | | उत्सवानिमित्त (पालखी, जयंती, गणेशोत्सव इ.) मांडव उभारणे व तद्. कामे करणे |
| ४ | RE22C301 | प्र.क्र.१ब उत्सव निमित्त (संत ज्ञानेश्वर महाराज पालखी, गणेशोत्सव इ.) मांडव उभारणे व तद्. कामे करणे |
| ५ | RE20C301/W4-357 | प्र.क्र. १७ येथे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज निवडुंग्या विठोबा मंदिर येथे पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध ठिकाणी मंडप व्यवस्था करणे |
| ६ | RE20C301/W4-358 | प्र.क्र. १७ येथे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांकरीता विविध ठिकाणी मंडप व इतर व्यवस्था करणे |

| | | |
|---|---|---|
| ७ | RE20C301/W4-359 | प्र.क्र.१७ मध्ये कामगार मैदान, डोके तालिम मित्र मंडळ, किराड हौद, स्वामी समर्थ मठ परिसरात पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध ठिकाणी मांडव व्यवस्था करणे |
| ८ | RE20C301/W1-362 | प्र.क्र. १८ मध्ये पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध ठिकाणी मांडव व्यवस्था करणे |
| ९ | RE20C301/W1-363 | प्र.क्र. १८ मध्ये बलवार आळी, २५१ गुरूवार पेठ, म.फुले वाडा परीसर, १२२ भवानी पेठ बँक ऑफ महाराष्ट्र, श्रमदान चौक, मंगल क्लब गणपती मंदिर याठीकाणी पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध ठिकाणी मांडव व्यवस्था करणे |
| १० | RE20C301/W1-368 | प्र.क्र. १९ मध्ये पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध ठिकाणी मांडव व्यवस्था करणे |
| ११ | RE20C301/W1-369 | प्र.क्र. १९ मध्ये पेस्तानजी दवाखाना, अण्णाभाऊ साठे वसाहत, लक्ष्मी बाझार, देना बँक रुपी बँक, बापूसाहेब पवार कन्या शाळा, घोडके मटण मार्केट याठीकाणी पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध ठिकाणी मांडव व्यवस्था करणे |
| १२ | CE 22A 548/SJ10-1237 | प्र.क्र.१७ ब मधील संत श्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळयासाठी नाना पेठ यथे मंडपविषयक कामे करणे |
| १३ | CE 22A 548/SJ10-1241 | प्रभाग क्र.१९ अ मधील काशेवाडी, हरकानगर, लोहियानगर, भवानी पेठ परिसरातील पालखीसाठी मंडप व्यवस्था करणे. |
| १४ | CE 22A 548/ SJ10-959 | प्रभाग क्र. १६ ब मधील विविध ठिकाणी श्री.संत ज्ञानेश्वर महाराज व श्री.संत तुकाराम महाराज पालखी मधील वारक-यांसाठी मांडव टाकणे व लाईट व्यवस्था करणे |

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी**

**विषय क्र.७५**

संदर्भः- १) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २३१२ दि.२७/०२/२०१८

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/५२ दि.७/५/२०१८ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८९ दि. २९/५/२०१८

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

अंशदायी वैद्यकीय सहाय योजना व शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजनेअंतर्गत, पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटल्सकडील वैद्यकीय बीलांचे परताव्यासाठी आणि योजनेच्या सभासदांकडील वैयक्तिक वैद्यकीय बीलांचे परताव्यासाठी, प्रचलित पध्दतीनुसार सद्यस्थितीत उपयोगात येणाऱ्या, सी.जी.एच.एस. दरपत्रकात अंतर्भूत सर्व वैद्यकीय उपचार व तपासण्यांचे दरांमध्ये ५०% वाढ करून पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटल्स प्रशासनास व योजनेच्या सभासदांस वैद्यकीय बीलांची प्रतिपूर्ती करणेस तसेच वैद्यकीय सहाय योजनेच्या सभासदांनी, पुणे म.न.पा. दवाखाने/रुग्णालये येथे उपलब्ध नसलेल्या लसी, बाहेरील औषध दुकानांमधून अथवा खाजगी रुग्णालयांतून खरेदी केल्यास आणि संबंधित लसींचे मूळ कॅश मेमो/रीसीट, प्रचलित धोरणानुसार इतर आवश्यक कागदपत्रांसहित प्रतिपूर्तीसाठी वैद्यकीय सहाय योजना कार्यालयाकडे सादर केल्यास, लसींच्या बीलांची प्रतिपूर्ती संबंधितांस नियमानुसार अनुज्ञेय करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७६**

संदर्भः- १) मा.मुख्य सभा ठराव क्र. ५९० दि.२८/२/२०११

२) महापालिका आयुक्त कार्यालयाचे जा.क्र. मआ/साप्र/१०४७ दि.२०/२/२०१८ चे विषयपत्र.

३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/८७ दि.२९/५/२०१८ चे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९३ दि. २९/५/२०१८

----

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

कुटूंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत महापालिका सेवकांना एक अपत्यावर कुटूंब नियोजन केल्या प्रित्यर्थ दिलेल्या दोन जादा वेतनवाढी बाबत वस्तुस्थिती व ज्यादा वेतनवाढ मंजूर करण्याचे अधिकार मे.शासनास असल्याची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूद विचारात घेऊन मा.महापालिका सभेचे ठराव क्र. ५९० दि.२८/२/२०११ अन्वये प्राप्त मंजुरीनुसार ज्या महानगरपालिका अधिकारी/सेवकांना यापूर्वीच सदर वेतनवाढी मंजूर करुन देण्यात आल्या आहेत अशा सर्व सेवकांच्या मंजूर केलेल्या/देण्यात आलेल्या वेतनवाढी दिलेल्या दिनांकापासून रद्द करणेस आणि त्या वेतनवाढी देय ठरत नाहीत असे समजून त्यांचे वेतनाचे फेरनिश्चितीकरण करणेस, अतिप्रदान झालेली वेतन रक्कम सुसह्य मासिक हप्त्यांमध्ये पुणे महानगरपालिका कोषात जमा करुन घेणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.७७</u>

संदर्भ:– १) मा.बापूराव कर्णेगुरुजी, मा.सौ.मुक्ता जगताप, मा.सौ.श्वेता गलांडे (खोसे) व मा.राहुल भंडारे यांचे दि.२५/५/२०१८ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९८ दि. २९/५/२०१८

––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे पेठ लोहगाव विमाननगर प्रभाग क्र.३ मधील जॉगरपार्क उद्यानात जेष्ठ नागरीक संघाचे सातत्याच्या मागणीनुसार २००६ साली मा.आमदार चंद्रकांत छाजेड साहेबांनी आमदार फंडातून २०X३५ फूट या साईजचे दोन हॉल बांधले काम पूर्ण झाल्यावर उद्घाटनाचा मोठा कार्यक्रम घेऊन हे दोन्ही हॉल विमाननगर मधील जेष्ठ नागरीकांचे संघास देत असल्याचे जाहीर करून दोन्ही हॉलच्या चाव्या जेष्ठ नागरीक संघाचे अध्यक्षांचे ताब्यात २८ मार्च २००६ रोजी दिल्या.

दोन हॉलपैकी १ हॉलमध्ये ग्रंथालय + पुरूषांसाठी योगा सुरू केला दुसरा हॉल जेष्ठ महिलांना योगा व इतर व्यायामासाठी दिला.

त्यावेळेपासून या दोन्ही हॉलची देखभाल दुरूस्ती, रंगरंगोटी, दैनंदिन सफाई, लाईट बिले इत्यादी खर्च तसेच ग्रंथालयासाठी हिन्दी, मराठी, इंग्रजी भाषेतील कथा, कांदब–या, थोरामोठयांची चरित्रे, वैज्ञानिक खेळाडू, यशस्वी उद्योगपतींचे चरित्रे, संशोधनात्मक , मनोरंजनात्मक, नवीन टेक्नॉलॉजी बाबतची अशी विविध प्रकारची जवळ जवळ ५००० पुस्तके घेतली. तसेच रोज ६ वर्तमानपत्रे जेष्ठ नागरिक संघाकडून पुरविली जातात.

गरजूंना रेशनकार्ड, पॅनकार्ड, आधारकार्ड, मतदार यादीत नावे नोंदविणे इ.समाजसेवी कामे जेष्ठ नागरिक संघाकडून केली जातात.

या जेष्ठ नागरिक संघात माजी सैनिक व सामाजिक दृष्टया दुर्बल घटकांतील नागरिकांची संख्या मोठी आहे. तसेच या जेष्ठ नागरिकांच्या ताब्यात दिलेल्या हॉलमध्ये देखभाल दुरूस्तीसह १२ वर्षे विनातक्रार काम काज चालू होते. गार्डनच्या संध्याकाळचे वेळेनुसार दोन्ही हॉलचा वापर सुरू होता. केवळ काही लोकांना जेष्ठ नागरीकांची शिस्त आवडली नाही. त्यामुळे तक्रारी झाल्या व हॉल वापरण्यास अचानक बंद केला.

तरी जागा वाटप नियमावली २००८ नुसार संयुक्त प्रकल्पातील भाग १० अनुक्रमांक १ नुसार या दोन्ही हॉलचे क्षेत्रफळ १५०० चौ फुटापेक्षा कमी आहे.म्हणून पुणे महानगरपालिका व जेष्ठ नागरिकांचे उतार वयातील जगणे आनंदी करण्यासाठी विविध उपक्रम व उतार वयातील उत्तम आरोग्य कसे राखावे, जेष्ठ नागरिक आनंदी जगणे आयुष्य कसे वाढविते यासाठी या क्षेत्रात काम करणारे उत्तम व्याख्याते आणून जेष्ठाचे प्रबोधन करणारा जेष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त प्रकल्पातून उत्तम समाज उपयोगी प्रकल्प चालविला जाणार आहे.

याचा विचार करून पुणे महानगरपालिका व विमाननगर जेष्ठ नागरिक संघ यांचा संयुक्त प्रकल्प म्हणून व्यवस्थापन व देखभाल दुरूस्तीसाठी सदर दोन्ही हॉल पूर्वीप्रमाणे जेष्ठ नागरिक संघास वापरण्यास देण्यास मान्यता मिळावी व नियमानुसार संयुक्त प्रकल्प म्हणून करारनामा करण्यास व स्वामित्वापोटी वार्षिक १ रूपया नाममात्र भाडे भरण्यास, करारनाम्यात किमान ५ वर्षाची मुदत नमूद करण्यास, करारनाम्यातील अटी व शर्तीचे जेष्ठ नागरिक संघाने काटेकोरपणे पालन करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

<u>विषय क्र.७८</u>

संदर्भ – १) मा.सौ.जंगले, मा.सौ.वस्ते ,मा. सौ.सहस्त्रबुध्दे , मा.प्रदिप ओसवाल व मा.महेश वाबळे , मा. धीरज रा.घाटे, मा. प्रदिप गायकवाड यांचे दि. ९/० ३/२०१८ चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.६१८, दि.९/०३/२०१८

––––

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेच्या इस्टीमेट कमिटी, २०५ कमिटी व ॲमिनिटी स्पेस कमिटी या कमिटीवर शहर सुधारणा समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा समावेश करण्यात यावा अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जून २०१८ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२९, दि.२३/४/२०१८ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.७९</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/३०, दि.२३/४/२०१८ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.५४, दि.११/०५/२०१८

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना माहे एप्रिल २०१८ मध्ये

खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे, धानोरी स.नं.४५सि.स.नं. १ ते ४९ | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.ब्ल्यूरेज डेव्हलपर्स एल.एल.पी | सी | ८१८०.४२ चौ.मी.(इमारत 'सी' चे जोते तपासणी नंतर देय २५% पूर्णत्वापोटी टी.डी. आर.) | ००४४५४ | एप्रिल २०१८ |

**विषय क्र.८०**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/३१, दि.२३/४/२०१८ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.५५, दि.११/०५/२०१८

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना माहे एप्रिल २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स.नं.११० ब/१,हडपसर, रामटेकडी,पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.आदिनाथ लॅण्ड स्पेस (एल.एल.पी) | सी | १६६३५.४७ चौ.मी. (इमारतीचे आर.सी.सी. व वीट बांधकामापोटी देय ३५%) | ००४४४८ | एप्रिल २०१८ |

**विषय क्र.८१**

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/टिडीआर/३२, दि.२३/४/२०१८ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.५६, दि.११/०५/२०१८

––––

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना माहे एप्रिल २०१८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा महिना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स.नं.४६ पैकी,४७ पैकी, सि.स.नं.१७२१,१७२३ ते १७२७ कोथरूड, श्रावणधारा,पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | किर्तीवर्धन डेव्हलपर्स अँड बिल्डर्स | सी | ८५६७.८४ चौ.मी. (इमारत 'सी', 'डी' व 'ई' चे जोते तपासणी नंतर देय २५% पूर्णत्वापोटी टी.डी.आर) | ००४५०१ | एप्रिल२०१८ |

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र.८२**

संदर्भः– मा. विशाल धनवडे व मा. संजय भोसले, यांची सूचना दि.६/१/२०१८

----

लालमहाला मधील हिंदवी स्वराज्याच्या राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचा अर्धकृती पुतळा असून राजमाता जिजाऊ यांच्या अर्धकृती पुतळया शेजारी श्रीमंत छत्रपती शहाजीराजे भोसले यांचा अर्धाकृती पुतळा बसविण्याबाबत शासनाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र.८३**

संदर्भः– मा. सुशिल मेंगडे, मा. राजेश बराटे व मा. सौ. वृषाली चौधरी यांची सूचना दि.१२/२/२०१८

----

प्रभाग क्र. ३१ मधील वारजे येथील तिरुपतीनगर याठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या लाईट हाऊ स प्रकल्पाचे उद्‌घाटन मा.ना. गिरीशजी महाजन, जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते,मा. अनिल शिरोळे, खासदार, मा. योगेशजी गोगावले, शहराध्यक्ष, पुणे शहर, भा.ज.पा., मा. भिमरावजी तापकीर, आमदार, मा.प्रा. सौ. मेधाताई कुलकर्णी, आमदार, माजी नगरसेवक शिवरामजी मेंगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात यावा.

या कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावे.

**विषय क्र.८४**

संदर्भः– मा.साईनाथ संभाजी बाबर यांची सूचना दि.१/३/२०१८

----

प्रभाग क्र. २७ मधील स.नं. ३९, कोंढवा खुर्द, पुणे या जागेवर क्रीडांगणाचे आरक्षण आहे. सदर छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण ही जागा पुणे मनपाच्या ताब्यात आहे.

सदर छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणाच्या प्रवेशद्वारावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

**विषय क्र.८५**

संदर्भः– मा. सौ. कालिंदा पुंडे व मा. सौ. अर्चना तुषार पाटील यांची सूचना दि.३/३/२०१८

----

महात्मा ज्योतिराव फुले सांस्कृतिक भवन, वानवडी या भवनाच्या परिसरामध्ये समाज सुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र.८६**

संदर्भः– मा. सौ. सुनिता वाडेकर, मा. सौ. सोनाली लांडगे यांची सूचना दि.२६/३/२०१८

----

प्रभाग क्र. ८ औंध – बोपोडी येथील डी.पी. रोड वरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहतीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा पुणे महानगरपालिकेकडून बसविणेत आलेला आहे.

देशातील स्मार्ट सिटीमध्ये पुणे शहराचा समावेश झाला असून सदरचा भाग स्मार्ट सिटी अंतर्गत येत असल्याने स्मार्ट सिटीला साजेसे व पुणे शहराच्या नावलौकिकात भर पाडणारे असे काम होणेसाठी सदरच्या अर्धपुतळा काढून त्या जागी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा सदर जागेचे सुशोभिकरण करुन बसविणेबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र.८७**

संदर्भः– मा. सौ. सुनिता वाडेकर, मा. सौ. सोनाली लांडगे यांची सूचना दि.२६/३/२०१८

----

प्रभाग क्र. ८ मधील खडकी रेल्वे स्टेशनजवळील पुणे शहरातील एकमेव हॉकी स्टेडियम असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉकी स्टेडियमचे उद्‌घाटन तसेच खडकी रेल्वे स्टेशनवरील नव्याने बांधण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पादचारी पुलाचे उद्‌घाटन मा. नामदार देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री

महाराष्ट्र यांचे शुभहस्ते, मा. नामदार रामदासजी आठवले साहेब, केंद्रीय राज्यमंत्री, समाज कल्याण विभाग यांचे प्रमुख उपस्थितीत व पुणे शहरातील सर्व केंद्रीय मंत्री, महाराष्ट्र राज्याचे मंत्री तसेच खासदार, आमदार, पक्षनेते, यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात यावे. सदरच्या कार्यक्रमाच्या आयोजनाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावेत.

**विषय क्र.८८**

संदर्भः- मा. आबा बागूल यांची सूचना दि.५/४/२०१८

----

प्रभाग क्र. ३५ मधील तळजाई टेकडी येथे पुणे महानगरपालिकेकडून नव्याने विकसित करण्यात आलेले भारतीय क्रिकेटपटू सदू शिंदे क्रिकेट स्टेडियमचे उद्घाटन मा. ना. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब, माजी केंद्रीय मंत्री यांच्या शुभहस्ते करण्यात यावे. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून मा.ना. आ. पृथ्वीराजजी चव्हाण, माजी मुख्यमंत्री यांस निमंत्रित करण्यात यावे.

तसेच सदर कार्यक्रमास स्थानिक खासदार, आमदार, नगरसेवक व पुणे मनपा पदाधिकारी यांना निमंत्रित करण्यात यावे.

सदर कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांस देण्यात यावे.

**विषय क्र.८९**

संदर्भः- मा. सौ. वर्षा तापकीर , मा.विशाल तांबे, मा.किशोर उर्फ बाळाभाऊ धनकवडे व मा.सौ.अश्विनी सागर भागवत यांची सूचना दि.५/४/२०१८ व दि.११/५/२०१८

----

आपल्या पुणे शहरातील श्री. सुर्यकांत भांडे (वडील), चि. सौरभ भांडे (मुलगा)व सौ. प्रतिभा भांडे (आई) रा. राजमुद्रा हौ. सो. धनकवडी पुणे या संपुर्ण भांडे कुटुंबीयांनी संकरॉक ते गेटवे ऑफ इंडिया हे ५ कि.मी. चे समुद्री अंतर १ तास २१ मि. मध्ये पार करून विश्वामध्ये याबाबत पहिला किताब मिळविला आहे. यामुळे आपल्या पुणे शहराचे नाव संपुर्ण देशामध्ये नव्हेतर जगामध्ये नावलौकिक झाले आहे.

तरी श्री.सुर्यकांत भांडे (वडील), चि. सौरभ भांडे (मुलगा)व सौ. प्रतिभा भांडे (आई) या भांडे कुटुंबाचा पुणे महानगरपालिकेतर्फे अभिनंदन करून विशेष सत्कार करण्यात यावा.

सदर कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांस देण्यात यावे.

**विषय क्र.९०**

संदर्भः- मा. सौ. अश्विनी नितीन कदम यांची सूचना दि.२/५/२०१८

----

प्रभाग क्र. ३५ क, पद्मावती पुलावरील स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावरील प्रसंगांच्या भित्तीशिल्पाचा अनावरण समारंभ व प्रभाग क्र. ३५ क, मधील पुणे महानगरपालिकेच्या कै. शिवशंकर पोटे दवाखाना येथे अद्ययावत ३ टेस्ला एम.आर.आय. मशीन व डायग्नोस्टिक सेंटरचे उद्घाटन भारताचे माजी केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांचे शुभहस्ते करण्यात यावे.

**विषय क्र.९१**

संदर्भः- मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर यांची सूचना दि.२/५/२०१८

----

प्रभाग क्र.१ आणि प्रभाग क्र.२ मध्ये विश्रांतवाडी येथील मुकुंदराव आंबेडकर चौक हा मुख्य चौक आळंदी रस्त्यावर आहे. या रस्त्याचे नामकरण कालकथित मुकुंदराव आंबेडकर चौक नाव समितीमध्ये यापूर्वीच मान्य केलेले आहे. या भागामध्ये गेली अनेक वर्षापासून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहाने साजरी होत असते. या परिसरामध्ये बहुतांश आंबेडकरी विचारांना मानणारा समाज येरवडा, विश्रांतवाडी, धानोरी, कळस, वडगावशेरी या संपूर्ण परिसरामध्ये येथे वास्तव्यास आहे.

मुकुंदराव आंबेडकर चौकामध्ये जे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुत्र मुकुंदराव आंबेडकर यांनी १९५८ मध्ये विश्रांतवाडी येथील या परिसराला भेट दिली होती. त्यामुळे या परिसरामध्ये आंबेडकरी चळवळीस ऐतिहासिक महत्व आहे. या चौकात होणाऱ्या नियोजित फ्लाय ओव्हर व ग्रेड सेप्रेटर यांच्या डिझाईनमध्ये दर्शनी भागामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुर्णाकृती पुतळा पुणे महानगरपालिकेच्या वतीने बसविण्यास मान्यता द्यावी.

सदरचा पुतळा हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा समिती विश्रांतवाडी यांच्यावतीने दिला जाणार आहे. तरी

सदरचा पुतळा स्विकारून सर्व आंबेडकरी जनतेची मागणी म्हणून पुणे मनपाने या चौकातील दर्शनी भागामध्ये सदर पुतळा बसविणेबाबत शासनाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

विषय क्र.९२

संदर्भः- मा.हेमंत रासने, मा.राजेश येनपुरे व मा.ॲड्.गायत्री खडके यांची सूचना दि.८/५/२०१८

----

प्र.क्र.१५ मध्ये ७६४ सदाशिव पेठ, पुणे.४११०३० या ठिकाणी येथे राहणाऱ्या सौ.स्मिता श्रीधर करंदीकर, यांना मा.राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित करून गौरविण्यात आलेले आहे. पुणे शहरामध्ये अशा प्रकारे सौ.करंदीकर या एकमेव शिक्षिकांना राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने आपल्या पुणे शहराचे संपूर्ण भारतामध्ये नावलौकिक झालेले आहे.

तरी सौ.स्मिता करंदीकर यांचा पुणे महानगरपालिकेमार्फत विशेष सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात यावे.

विषय क्र.९३

संदर्भः- मा. दत्तात्रय धनकवडे, मा. प्रकाश कदम, मा. सौ. मनिषा कदम, मा. सौ. राणी भोसले,मा. वसंत मोरे,गटनेते, मनसे, मा. श्रीमती अमृता बाबर, मा. सौ. स्मिता कोंढरे, मा. युवराज बेलदरे यांची सूचना दि.१७/५/२०१८

----

नानासाहेब पेशवे जलाशय (कात्रज तलाव) या ठिकाणी बसविण्यात आलेल्या छत्रपती संभाजी महाराजांचा फायबरचा पुतळा काढून त्या ठिकाणी शासन नियमानुसार छत्रपती संभाजी महाराज यांचा पंचधातुचा पुतळा तलावाच्या मुख्य प्रवेश द्वारावर बसविण्यात यावा. त्यासाठी मा. नगरसेवक निधी उपलब्ध करुन देतील व मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर पुढील कार्यवाही साठी प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा.

**( टिप – विषय क्र.८२ ते ९३ हे दि.११/५/२०१८ व दि.२१/५/२०१८ रोजी मा.पक्षनेते सभेत फेरफारासह मान्य झालेले आहेत.)**

विषय क्र.९४

संदर्भः- मा.सौ.सुजाता शेट्टी व मा.सौ.पल्लवी जावळे यांची सूचना दि.१७/५/२०१८

----

गाडीतळ पोलीस चौकी हे पूर्वीचे नाव असून सदर वस्तीला तथागत भगवान गौतम बुध्द नगर नाव दिल्याने ही चौकी सुध्दा त्यामध्ये येत असून सदर चौकीला तथागत भगवान गौतम बुध्द नगर पोलीस चौकी नाव देण्यात यावे. सदर ठराव मान्य करून राज्य शासनाला पाठवावा.

विषय क्र.९५

संदर्भः- मा.अविनाश बागवे, मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव व मा.योगेश ससाणे यांची सूचना दि.२५/५/२०१८

१) मा.जयंत भोकरे व मा.रशिद शेख यांचे दि.१३/८/२००३ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२५२ दि. २२/८/२००३

---

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना टी.डी.आर.( विकास हस्तांतरण हक्क ) दिला जातो. त्याचा माहिती अहवाल दर महिन्याला पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मा.महा.आयुक्त यांनी त्यांची अंमलबजावणी करावी.

असा मनपा ठराव क्र.३७५, दिनांक२४/९/२००३ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भः- १) मा.जयंत भोकरे व मा.रशिद शेख यांचे दि.१३/८/२००३ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२५२ दि. २२/८/२००३

----

पुणे शहरामध्ये पुणे महानगरपालिका ही करोडो स्क्वे.फुट.टी.डी.आर. विविध कारणासाठी आतापर्यंत दिला आहे. सन १९९० च्या दशकापासून टी.डी.आर.मोबदल्याच्या स्वरूपात देण्याची संकल्पना प्रशासनाने मांडली असता, लोकांमध्ये टी.डी.आर.संबंधात अनेक प्रश्न होते. त्यामुळे लोकांमध्ये टी.डी.आर.संदर्भात खात्री घेऊन योजना यशस्वी करण्यासाठी दिरंगाई होऊ नये व सर्व प्रक्रिया जलद गतीने व्हावी या करिता प्रशासकीय स्तरावर टी.डी.आर.देण्याची तरतूद करण्यात आली होती व आहे. परंतु गेल्या दोन शतकापासून मागील अनुभव पाहता करोडो स्क्वे.फुट.टी.डी.आर.मुळे या शहराच्या मुलभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात ताण पडत आहे व त्यामुळे नागरिकांच्या

सार्वजनिक विकास कामांवर त्याचा परिणाम होत आहे. तसेच गेल्या काही वर्षापासून चुकीच्या पध्दतीने टी.डी.आर.देणे, टी.डी.आर.चे नावाखाली अनाधिकृत बांधकाम करणे,नजिकच्या काळातील मनपा कार्यालयातून डी.आर.सी.चोरीला जाऊन गहाळ होणे या प्रकाराच्या अनेक घटना घडल्या आहेत, म्हणून प्रशासनाने मुख्य सभा ठराव क्र.३७५,दि.२४.९.२००३ निरस्त करून या पुढे टी.डी.आर.ची सर्व प्रकरणे शहर सुधारणा समितीकडे अवलोकनार्थ न पाठविता मान्यतेसाठी पाठवावे व शहर सुधारणा समितीची व मुख्य सभेची मान्यता झालेवरच संबंधित व्यक्तिस डी.सी.आर.प्रशासनाने कडून देण्यात यावे. असे केल्याने शहरामध्ये किती टी.डी.आर.दिला जातो व त्यामुळे नागरी सुविधांवर जो ताण पडतो त्याचेवर नियंत्रण ठेवण्यात तसेच महानगरपालिकेची व मुख्य सभेची त्यावर देखरेख राहिल.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ८/६/२०१८.

**सुनील पारखी**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**